दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ९९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२१ नोव्हेंबर २०२४

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार ? निकालाकडे लक्ष !

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२०, मुंबई : महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक पार पडली आहे. या निवडणुकीसाठी आत्तापर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार ५९ टक्के मतदान झालं आहे. महाविकास आघाडी की महायुती याचा फैसला २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. मात्र मतदान संपल्यानंतर तातडीने एक्झिट पोल्स समोर आले आहेत. विविध दहा एक्झिट पोल्सपैकी सहा पोल्सनी महायुतीचं सरकार येईल असा अंदाज वर्तवला आहे. झारखंड आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांचे निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहेत. एका एक्झिट पोलने मुख्यमंत्री म्हणून कुणाला लोकांची सर्वाधिक पसंती आहे आणि कुणाला कमी पसंती आहे याचा अंदाज वर्तवला आहे.

महाराष्ट्रात पार पडलेली निवडणूक काहीशी वेगळी

महाराष्ट्रात पार पडलेली निवडणूक वेगळी ठरली आहे. कारण यावेळी महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा थेट सामना आहे. इतके दिवस जे चार प्रमुख पक्ष होते त्यातल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन तुकडे झाले आहेत.

आता एक्झिट पोल्सच्या अंदाजानुसार महायुतीची सत्ता येईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. नेमकं काय घडतं ते २३ नोव्हेंबरला स्पष्ट होणार आहे. २०१९ ला महायुती विरुद्ध काँग्रेस राष्ट्रवादीची आघाडी असा सामना झाला होता. मात्र निकालानंतर सगळंच चित्र बदललं होतं. त्यावेळी निकालाच्या दिवशी उद्धव ठाकरेंनी सगळे पर्याय खुले आहेत सांगितलं.

त्यानंतर पहाटेचा शपथविधी, महाविकास आघाडीचा प्रयोग, २०२२ चं एकनाथ शिंदेंचं बंड, २०२३ चं अजित पवारांनी महायुतीत येणं या सगळ्या घडामोडी महाराष्ट्राने पाहिल्या आहेतच. लोकसभेला या सगळ्या प्रयोगांचा भाजपाला फटकाही बसला होता. आता विधानसभा निवडणुकीत भाजपा महायुती कमबॅक करेल असं एक्झिट पोलचे अंदाज सांगत आहेत. मुख्यमंत्री म्हणून कुणाला पसंती? हे आपण जाणून घेऊ.

पिपल्स पल्सच्या एक्झिट पोलनुसार मुख्यमंत्री म्हणून कुणाला पसंती?

एकनाथ शिंदे यांना ३५.८ टक्के लोकांनी पहिली पसंती दर्शवली आहे. तर २१.७ टक्के लोकांनी उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री म्हणून पसंती दर्शवली आहे. देवेंद्र फडणवीस यांना ११.७ टक्के लोकांनी मुख्यमंत्री म्हणून पसंती दर्शवली आहे तर अजित पवार यांना २.३ टक्के लोकांनी पसंती दर्शवली आहे. नाना पटोले यांना १.२ टक्के लोकांनी पसंती दर्शवली आहे. अर्थात पीपल्स पल्सचा हा अंदाज आहे. प्रत्यक्षात नेमकं काय होणार हे २३ नोव्हेंबरला निकाल काय लागतो आणि जनमताचा कौल कुणाला आहे हे चित्र स्पष्ट झाल्यावरच कळणार आहे.

प्रमुख एक्झिट पोल्सच्या अंदाजानुसार राज्यात महायुतीचं सरकार

दुसरीकडे महत्वाच्या पोल्सनी महायुतीचं सरकार स्थापन होईल हेच अंदाज वर्तवले आहेत. चाणक्यच्या एक्झिट पोलनुसार महायुतीला १५२ ते १६० जागा मिळतील हा अंदाज आहे. तर याच पोलनुसार महाविकास आघाडीला साधारण १३० ते १३८ जागा मिळतील असा अंदाज आहे. मॅटरिझच्या पोलनुसार महायुतीला १५० ते १७० जागा आणि महाविकास आघाडीला ११० ते १३० जागा मिळतील असा अंदाज आहे. नेमकं काय होणार? याचं उत्तर २३ नोव्हेंबरला मिळणार आहे.

पेणमधे उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६१.८०टक्के मतदान

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२०, पेण : पेण विधानसभा मतदार संघामधे सकाळी ७.०० पासून सायंकाळ पर्यंत शांततेत मतदान झाले. विधानसभा मतदार संघातील ३८५ केंद्रावर एकुण ३ लाख ७ हजार ९७९ मतदारांपैकी सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत पहिल्या टप्प्यात ९ टक्के मतदान झाले. सकाळपासून दुस-या टप्प्यात ११.०० वाजेपर्यंत १८.०९ टक्के मतदान झाले दुपारी १.०० वाजे पर्यंत तिस-या टप्प्यात ३२.१० टक्के मतदान झाले. ३.०० वाजेपर्यंत ४८.१८ टक्के मतदारांनी मतदान केले होते. दुपारी ३.०० वाजेपर्यंत एकुण १लाख, ४८ हजार ३७६ मतदारानी मतदान केले. यामधे पुरुष ७५हजार २६ मतदार तर महिला ७३ हजार ३५० मतदारांनी आपला ईव्हीएम मशीनचे बटन दाबून आपला हक्क बजावला. सायंकाळी ५.०० वाजता १३टक्के मतदान वाढून ही आकडेवारीचा ६१.८०. टक्यावर जाऊन पोहचली आहे. ७० टक्के मतदान होण्याची शक्यता आहे. पाच वाजेपर्यंत २ लाख ९ हजार ४७२ एकुण. मतदान झाले असून या मधे १ लाख ६ हजार २२५ पुरुष तर १लाख ०३ हजार २४७ महिलांनी हक्क बजावला आहे.

मतदारांचा ओढा नवीन उमेदवारांकडे झुकला की प्रस्थापीत उमेदवाराकडे हे समजू शकलेल नाही पण युवा मतदार मतदानासाठी उत्साही दिसून आला. तिरंगी लढत असून तीनही उमेदवार हे आगरी समाजाचे आहेत. या तिघांपैकी समाजाची मते ज्या उमेदवाराला मतपेटीत पडतील तो विजयाचे तोरण बांधणार आहे.हे निश्चीत पेण तालुका वगळता पाली,सुधागड,नागोठणे रोहा या तालुक्यातील मतदाराच्या हातात पेणच्या या तीन उमेदवारांचा विजयाचे भवितव्य दडलेले आहे.

कापणीचा सुगीचा हंगाम सुरु असल्याने सकाळी मतदानाची टक्केवारी कमी झाली मात्र दुपारी हळूहळू मतदानाचा टक्का वाढत जाऊन एकुण मतदान ४८.१८ टक्के झाले आहे. मतदान संपेपर्यंत ६५ टक्के मतदान होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.मतदानासाठी महिला व युवा वर्गाचे अधिक योगदान दिसून आले आहे. मतपेटीत उमेदवारांचे भवितव्य बंद झाले असून २३ तारखेला निकालात विजयाचा फटाका कोणाच्या नावाने फुटणार हे दुपारी २ वाजता दिसून येईल.

पुन्हा एका उमेदवारावर प्राणघातक हल्ला ! दुचाकीवर आलेल्या सात गुंडांनी

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२०, बुलढाणा : स्वराज्य पक्षाचे जळगाव-जामोदचे उमेदवार प्रशांत डिक्कर हे आपल्या सहकाऱ्यांसम वेत आज मतदानाच्या निमित्ताने बुथ पाहणीसाठी शेगावकडे येण्यास निघाले होते. यावेळी दुचाकीवरून आलेल्या पाच ते सात गुंडांनी त्यांची गाडी अडवली व गाडीवर दगडफेक सुरू केली. यामध्ये ते गंभीर जखमी झाले असून घटनेने जळगाव मतदारसंघ, बुलढाणा जिल्ह्यासह राज्यात खळबळ उडाली आहे.

शेगाव तालुक्यातील कालखेड जवळ धारधार शस्त्रांनी हल्ला चढवला. या हल्ल्यात प्रशांत डिक्कर व चालक गंभीर जखमी झाले. याचवेळी प्रशांत डिक्कर यांना छातीत असह्य वेदना झाल्याने ते अद्यापही बेशुद्धावस्थेत आहेत. त्यांची प्रकृती अत्यवस्थ असून पुढील उपचारांसाठी त्यांना अकोला येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. डिक्कर समर्थकांकडून , हा हल्ला विरोधक गुंडानी केला असल्याचे सांगितले जात आहे. छत्रपती संभाजीराजे यांनी डिक्कर यांच्यासाठी ३ सभा १ रॅली केली होती. त्यावेळी उमेदवारासह संभाजीराजेंनी देखील याभागातील दहशती विषयी चिंता व्यक्त केली होती. एक विस्थापित भूमिहीन शेतमजुराचा मुलगा, शेतकरी चळवळीतील सामान्य कार्यकर्ता प्रथापितांसमोर मोठे आव्हान उभे करतो, हे प्रस्थापित नेत्याला पाहवले नाही. लोकशाही पद्धतीने आपला पराभव दिसत असल्याने वैफल्यग्रस्त झालेल्या स्थानिक मोठ्या नेत्याने हा भ्याड हल्ला घडवून आणलेला आहे. हा माज आम्ही उतरवू, अशी प्रतिक्रिया संभाजीराजे छत्रपती यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

शेगाव कालखेड गावाजवळ हल्ल्यानंतर प्रशांत डिक्कर यांना शेगावमधील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले परंतु प्रकृती गंभीर असल्याने डिक्कर यांना अकोला येथील

हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारांसाठी पाठविण्यात आले आहे. त्यांना अटॅक आल्याची शक्यता आहे.

दरम्यान महाराष्ट्र स्वराज्य पक्षाने या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. पक्षप्रमुख छत्रपती संभाजीराजे अकोल्यातील ओझोन रुग्णालयाला भेट देणार असून, प्रशांतच्या मागे ठामपणे उभे आहे, असे सांगण्यात आले आहे. जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघातील स्वराज्य पक्षाचे उमेदवार प्रशांत डिक्कर शेतकऱ्यांचा आवाज असून त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा जाहीर निषेध करीत असल्याचे पक्षातर्फे प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे. जळगाव जामोद मध्ये गुंडांकडून स्वराज्य पक्षाचे उमेदवार प्रशांत डिक्कर यांच्यावर जीवघेणा भ्याड हल्ला झाला असून त्यांच्यावर उपचार चालू आहे. प्रशांत चळवळीतील लढवय्या कार्यकर्ता असून निवडणुकातील पराभव समोर दिसत असल्याने काही प्रस्थापित नेत्यानी हा हल्ला केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

बारामतीत राडा मतदान चिठ्ठ्यांवर घड्याळाचे चिन्ह?

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२०, पुणे : मतदारांच्या हातामध्ये घड्याळाचे चिन्ह असलेल्या चिठ्ठ्या आढळून आल्याने बारामतीत राष्ट्रवादी अजित पवार पक्ष आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये बारामतीत बाचाबाची आणि दमबाजीचा प्रकार घडला. त्यामुळे बारामती शहरातील वातावरण गंभीर झाले.

बारामती शहरातील बालक मंदिर येथील मतदान केंद्रावर हा प्रकार घडला. या मतदान केंद्रावर येणाऱ्या मतदारांच्या हातामध्ये घड्याळाचे चिन्ह असलेल्या चिट्ट्या आढळून आल्या. ही बाब राष्ट्रवादी शरद पवार गटातील कार्यकर्त्यांच्या लक्षात येताच त्यांनी यावर आक्षेप घेतला. यावरून दोन्ही गटात बाचाबाची होऊन एकमेकांना दमबाजी करण्यात आली. ही बाब महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या आई शर्मिला पवार यांना समजली असता त्या केंद्राच्या ठिकाणी आल्या.

मला कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आले की, आमच्यावर दबाव येत आहे. दमबाजी केली जात आहे. जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे. मतदानासाठी येणाऱ्या मतदारांकडे घड्याळ चिन्ह असलेल्या चिठ्ठ्या मला या ठिकाणी आढळून आलेल्या आहेत. याबाबत आम्ही संबंधितांकडे लेखी तक्रार करणार आहोत. तसेच धमकी देण्याबाबतही तक्रार करणार आहोत. धमकी देणारे येथील स्थानिक पदाधिकारी, नेते आहेत. त्यांची नावे लवकरच समोर येतील.

हा आरोप खोटा आहे. तसे झालेले असेल तर सीसीटीव्ही कॅमेरामध्ये ते रेकॉर्ड झालेले असेल. निवडणूक आयोग बघेल. आज आम्ही एवढ्या निवडणुका पार पाडल्या. मात्र कधीही आमच्या कार्यकर्त्यांनी अशा पद्धतीने कधीही वक्तव्य केलेली नाहीत. आम्ही सुसंस्कृत महाराष्ट्र मध्ये राहत असून, सुसंस्कृतपणा दाखवतो. शाहू फुले आंबेडकरांची आमची विचारधारा आहे. त्यामुळे माझा कार्यकर्ता असे करणार नाही. असा माझा माझ्या कार्यकर्त्यावर ठाम विश्वास आहे. असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

धक्कादायक ! महाविद्यालयातील मुलींकडून बोगस मतदान करून घेण्याचा प्रयत्न

दि.२०, नागपूर : मतदान केंद्रावर अनेक मतदारांची नावे गहाळ असणे अशा तक्रारी आहेत. यामुळे मतदारांना त्रासही सहन करावा लागला. मात्र, हिंगणा विधानसभा मतदारसंघात गंभीर प्रकार समोर आला आहे. येथील भाजपचे उमेदवार समीर मेघे यांच्याविरोधात तक्रार करण्यात आली आहे. त्यांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींकडून बोगस मतदान करून घेण्याचा प्रयत्न केला अशी तक्रार आहे.

या विद्यार्थिनींचे आधार कार्ड तपासले असता त्या बाहेर राज्यातील असल्याचे दिसून आले. त्यामुळे अन्य पक्षाच्या कार्यकर्त्यांनी यावर आक्षेप घेतला. परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली. तसेच समीर मेघे यांच्या विरोधात घोषणाही देण्यात आल्या. यासंदर्भातील व्हीडीओ समाजमाध्यमांवर चांगलाच व्हायरल झाला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार

या संपूर्ण प्रकरणावर निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली आहे.

यानुसार, हिंगणा विधानसभा मतदारसंघातील वानाडोंगरी, इसासनी, निलडोह, डिगडोह येथील मतदान केंद्रावर भाजप उमेदवार समीर मेघे यांच्या महाविद्यालयातील बाहेर राज्यातील व बाहेर जिल्ह्यातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे बोगस मतदान करवून घेत आहे. मतदान करून निघालेल्या विद्यार्थ्यांना विचारले असता त्यांचे आधार कार्ड बाहेरच्या राज्यातील आढळून आले आहे. आम्हाला मेघे यांनी मतदान करायला सांगितले त्यामुळे आम्ही मतदान केले असे विद्यार्थिनींनी सांगितले. आणि अजून पाच हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांकडून मतदान करवून घेतले जाणार आहे. या सर्व प्रकारामुळे लोकशाहीला धोका असून मतदान प्रक्रिया बाधित होत आहे.

त्यामुळे सदर उमेदवार करत असलेल्या गैरप्रकाराला तात्काळ थांबवून त्यांच्यावर कार्यवाही करणे गरजेचे आहे. याप्रकारामुळे स्थानिक मतदारांच्या भावना तिव्र झाल्या असून त्यामुळे कोणताही अनूचित प्रकार घडू शकतो आणि त्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास त्यास प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील. यामुळे हिंगणा विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत असलेल्या बोगस मतदान थांबविण्यात यावे, अन्यथा महाविकास आघाडीचे संपूर्ण कार्यकर्ते व पदाधिकारी रस्त्यावर उतरून तिव्र आंदोलन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी, अशी तक्रर आहे.

मुंबईच्या कमाल तापमानात घट

दि.२०,मुंबई : मुंबईत रात्री काहीसा गारवा आणि दिवसा उकाडा अशी स्थिती असून, किमान तापमानाचा पारा शनिवारी २१.४ अंश सेल्सिअसवर होता. तर कमाल तापमानात चढ – उतार सुरूच आहे. मागील दोन दिवस मुंबईच्या कमाल तापमानात घट झालेली आहे. मात्र, किमान तापमानाचा पारा सध्या चढा असल्याने पहाटे किंचीतसा गारवा असतो. मुंबई शहर आणि उपनगरांतील नागरिकांना पहाटे गारवा आणि दुपारी उकाडा अशा हवामानाला तोंड द्यावे लागत आहे. कमाल तापमानात घसरण होत असली तरी किमान तापमानाचा पारा अजूनही चढाच आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात बुधवारी ३३.३ तर सांताक्रूझ केंद्रात ३४.३ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. तर दोन्ही केंद्रावरील किमान तापमान अनुक्रमे २३.२ आणि २०.२ अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले. सध्या मुंबईत कमाल आणि किमान तापमानामध्ये सातत्याने चढ उतार सुरू आहे. त्यामुळे कधी पहाटे गारवा असतो तर दिवसा उकाडा जाणवतो.

एक कोटींचा गांजा जप्त...!

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१९, छत्रपती संभाजीनगर : जिल्ह्यातील करमाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोमवारी ४९४ किलो वजनाची गांजाची झाडे पकडण्यात आली असून, त्याची किंमत एक कोटी रुपये आहे. या प्रकरणी अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार (एनडीपीएस) गुन्हा दाखल करण्यात आला. लामकाना येथे दोन ठिकाणी ही कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक भारत निकाळजे यांनी दिली. लामकाना येथील गट क्रमांक १८५ व गट क्रमांक ११३ येथील शेतातील तूर व कापसाच्या पिकात गांजाची रोपे लावण्यात आली होती. या संदर्भातील माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावरन कमलअली चांद शहा आणि चंद्रकांत रघुनाथ बारबैले यांच्या शेतात ठापा टाकण्यात आला. त्यात एका शेतात गांजाची ९४ झाडे तर दुसरीकडे ८२ झाडे होती. चाँद यांच्या शेतातून २५४ किलो म्हणजे ५० लाख ८२ हजार किमत असलेली तर २४१ किलो गांजा बारबैले यांच्या शेतातून जप्त करण्यात आला. त्याची किंमत ४८ लाख २५ हजार रुपये असून, कमलअली चाँद शहा याला अटक करण्यात आली आहे. चंद्रकांत बारबैले हा पसार झाला.

नागरिकाचा लाभार्थी झाला, पण..

आज पन्नाशीत असलेल्या शहरी ते ग्रामीण अशा वेगवेगळ्या स्तरातील मित्रमंडळींशी नुकतीच तपशीलवार चर्चा झाली. आज जवळपास सर्वांकडे सर्व आहे म्हणजे कपडे आहेत, टीव्ही, मोबाइल आहे. त्यामुळे सर्व जण शाळेत होते त्यावेळेपेक्षा श्रीमंत झाले आहेत असे म्हणता येते किंवा भासते. लाभार्थी म्हणून वर्गीकरण सुरू केले की स्तर लक्षात येत जातात. पिवळे, पांढरे आणि केशरी रेशन कार्ड वगैरे! बहुतांश जणांना आजही धान्यांसाठी रेशनच्या रांगेत उभे राहावे लागते आहेच. बहुतेकांच्या बायका या योजनेत गॅस मिळाल्यामुळे हसणाऱ्या अशा मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी आहेत! शेतकरी मित्रांबरोबर चर्चा करताना तोच नेहमीचा सूर या ठिकाणी होता तो म्हणजे शेती परवडत नाही, भाव मिळत नाहीत खर्च वाढतो आहे, शेती नको इ.इ. थोडक्यात चर्चा सुरू होती. अधूनमधून निवडणुका या विषयावर चर्चा होत होतीच.

सर्व जण एकाच गावातील असल्यामुळे आणि गावी नेहमीच जाणे होत असल्यामुळे खास करून शेती करणाऱ्या मित्रांचा तपशील मिळत होता त्यामुळे त्याआधारे चर्चा सुरू करण्याची माझी धडपड सुरू होती. त्याला यश येत होते. पूर्वीपेक्षा उत्पादन चांगलेच वाढले आहे. पूर्वी माळावर हुलगा, मटकी पेरायचो. आज द्राक्ष, डाळिंब आणि भाजीपाला पिकविला जातो आहे. उत्पादन वाढले कारण तंत्रज्ञान मिळाले, सिंचन सुविधा आल्या. काही जणांनी आवर्जून सांगितले की कोरडवाहू शेती बागायती झाली आणि आज बागायतदार म्हणून ओळख मिळाली, कारण रोजगार हमीतून विहीर मिळाली आणि त्याच योजनेतून डाळिंब बागसुद्धा झाली. पूर्वी असणारी सावकारी खूप कमी झाली यावर सर्वांचे एकमत होते आणि त्याला कारण बँकांचे व्याजदर आणि कर्जपुरवठा सुलभ झाला आहे असा एक सूरही होता. थोडक्यात ऐन उमेदीत म्हणजे वयाच्या वीस-पंचविशीमध्ये ज्यांना अशा योजनांचा, तंत्रज्ञानाचा हातभार मिळाला ते पूर्वीपेक्षा शेती चांगली पिकते आहे असा सूर लावत होते आणि जोडीला परवडत नाही म्हणूनसुद्धा आवर्जून सांगत होतेच (उत्पादन वाढीची संधी मिळाली, उत्पन्न वाढीच्या संधीच्या शोधात असे). तरीही शेती चांगली पिकते आहे ही त्यांच्यासाठी गौरवाची बाब नक्कीच होती! वयाच्या विशी-पंचविशीतच शहरात गेलेल्या मित्रांची कथा आणखी वेगळी होती. त्यांना आजही शहर बरे वाटते. कारण रोजगार मिळतो. कोणत्या परिस्थितीमध्ये गावी याल अशा मजेशीर प्रश्नावर त्यांनी उत्तर दिले, तुमचे बरे चालले आहे असे वाटले की गावी येऊ. शहरात असणाऱ्या जवळपास प्रत्येकाला गावाकडे पूर्वीच्या पडक्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधण्याची आणि दोन्ही मुलांपैकी किमान एका मुलाचे लग्न गावाकडे करण्याची इच्छा आहे. असे का या प्रश्नाच्या उत्तरादाखल अनेक किस्से ऐकायला मिळाले. त्याबद्दल थोडक्यात सांगायचे तर त्यांना तेव्हा जे करता आले नाही ते आज दणक्यात करून दाखवायचे आहे. आज ज्यांच्यासमोर त्यांना हे करून दाखवायचे आहे ते तेव्हा मोठ्या शेती असणाऱ्या कुटुंबातील होते आणि हे मात्र एक तर भूमिहीन किंवा कमी शेती किंवा कमी उपजावू शेती असणाऱ्या कुटुंबातील होते. आज त्यांनी गमतीने का असेना एक कबूल केले आहे की शहरात गेल्यामुळे चिरेबंदी वाड्यात राहणाऱ्याची बरोबरी करता येऊ शकते. खरेतर शहरात त्यांच्याकडे आणखी चांगले घर नाही. मुलांच्या शिक्षणाची काळजी आहे. परंतु पोटापुरते मिळते त्यामुळे बरेच म्हणायचे असा एकंदरीत सूर!

चर्चा होत राहिली. विषय आणि तपशील मिळत राहिला. त्यावर पुढे एक-दोन दिवस विचार केल्यावर लक्षात आले की संधी/ पर्याय मिळत गेले तसे स्तर बदलत गेले. त्या वेळी काही जणांनी आयटीआय केले, शहरात नोकरीची संधी मिळाली शेतमजुराच्या स्तरातून नोकरदारच्या स्तरात गेले. ती संधी मिळाली नसती तर आजही शेतमजूर राहिले असते. आई वडिलांबरोबर डांबरी रस्ता बांधणीच्या कामावर गेलेल्या तुकाला मामाने रिक्षा घेऊन दिली म्हणून तो आज दोन रिक्षांचा मालक असल्याचे अभिमानाने सांगतो! रोजगार हमी योजनेमुळे डाळिंब बागायतदार अशी ओळख मिळवलेला मित्र ही योजना नसती तर आजही कोरडवाहू शेतकरीच राहिला असता. गावाजवळ साखर कारखाना, दूध डेअरी नसती तर शहरात जाणाऱ्या मित्रांची संख्या दुपटीने वाढली असती. प्रत्येकाला संधी मिळत गेली आणि त्याचा आर्थिक स्तर बदलत गेला. ज्यांना अशी कोणतीच संधी मिळाली नाही त्यांना मात्र आहे त्याच ठिकाणी राहावे लागले. त्यांना संधी का मिळाली नाही? कारण त्यांना शिक्षण मिळाले नाही, शेती थोडी तीही कोरडवाहू. त्यामुळे काही जण शेती असूनही हंगामी मजूर म्हणजेच आणखी खालच्या स्तरात ढकलले गेले. त्यांची संख्याही तुलनेत मोठीच आहे.

सर्व बालकांना समान संधीची गरज

२० नोव्हेंबरला जागतिक बालदिन असतो. भारतात मात्र १४ नोव्हेंबरला बालदिन साजरा करतात. जागतिक पातळीवर दरवर्षी २० नोव्हेंबरला बालदिन उर्फ चिल्ड्रन्स डे साजरा केला जातो. सन १९५९ सालापर्यंत बालदिन ऑक्टोबर महिन्यात असायचा. सन १९५४मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने ठरवल्यानुसार पहिल्यांदाच बालदिन साजरा झाला.

लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्मांबाबतचे सामंजस्य वाढावे तसेच बालदिन साजरा करण्यामुळे जगभरातल्या मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना रुजावी, असाही हेतू यामागे होता. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की सन १९५९मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने बालहक्कांची सनद-४ डिक्लरेशन ऑफ चिल्ड्रन्स राइट्स स्वीकारली. शिवाय सन १९८९मध्ये याच दिवशी बालहक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ राष्ट्रांनी मान्य केले आहेत. सर्वांत पहिला बालदिन ऑक्टोबर १९५३मध्ये जगभर साजरा करण्यात आला. यासाठी जिनीव्हाच्या आंतरराष्ट्रीय बालकल्याण संघटनेचा पुरस्कार लाभला होता. त्यानंतर कै.श्री.व्ही.के.कृष्णमेनन यांनीही आंतरराष्ट्रीय बालदिनाची संकल्पना उचलून धरली व सन १९५४मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने ती स्वीकारली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने ठरवल्यानुसार २० नोव्हेंबर हा जागतिक बालदिन मानला जातो. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्मांबाबतचे सामंजस्य वाढवावे तसेच जगभरातल्या मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे, असा हेतू यामागे होता. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे भारतात मात्र माजी पंतप्रधान पंडित नेहरूजी यांच्या जन्म दिवशी म्हणजे १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. पंडित नेहरूजींना मुलांविषयी वाटणार्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा हा मार्ग आहे. बालकांनाही आयुष्याचा आनंद घेण्याचा मौजमस्ती करण्याचा हक्क आहे आणि या मुलांम धूनच देशाचे भावी सुशिक्षित आणि मनाने व शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या आपल्या नशीबवान मुलांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याबाबतची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांच्या मनात रुजवली तर भारताचे भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतीलच शिवाय कायमच वंचित आणि नकारात्मक जगणे वाट्याला आलेल्या एखाद्या दुर्दैवी बालकालाही आपल्या या प्रयत्नांमुळे चांगले आयुष्य मिळू शकेल.

बालदिन साजरा करताना आपण अर्थातच चाचा नेहरूजींचे त्यामागील विचार समजून घ्यायला हवेत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधीही मोठ्या प्रमाणात मिळाल्या पाहिजेत. बालदिनाच्या निमित्ताने आपणांपैकी प्रत्येकाला मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याबाबतच्या आपल्या वचनबद्धतेची आठवण राहते. भारताच्या प्रदीर्घ स्वातंत्र्य लढ्यानंतरचे पहिले पंतप्रधान होते पंडित नेहरू. बालकांविषयी पंडित नेहरूजींना वाटणार्या प्रेमाची आठवण म्हणून १४ नोव्हेंबर हा त्यांचा जयंतीदिन आपल्या देशात बालदिनाच्या रूपाने साजरा केला जातो. भारतातील सर्व बालकांच्या वास्तविक मानवी हक्कांवर पुनर्विचार करण्यासाठी दरवर्षी २० नोव्हेंबर रोजी बाल हक्क दिन साजरा केला जातो. लोकांना त्यांच्या मुलांच्या सर्व हक्कांबद्दल जागरूक करण्यासाठी राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाद्वारे दरवर्षी या दिवशी राष्ट्रीय असेंब्लीचे आयोजन केले जाते. २० नोव्हेंबर हा दिवस जगभरात जागतिक बालदिन वा आंतरराष्ट्रीय बाल हक्क दिन म्हणूनही साजरा केला जातो. भारतासह आंतरराष्ट्रीय सम ुदायाचे सदस्य बाल हक्कांच्या पुनर्मूल्यांकनासाठी विविध कार्यक्रम आयोजित करून जगभरात हा दिवस साजरा करतात. बालकांच्या हक्कांनुसार बालपणात बालकांना कायदेशीर संरक्षण, काळजी आणि संरक्षण देणे अर्थात त्यांची शारीरिक आणि मानसिक अपरिपक्वता प्रदान करणे अत्यंत आवश्यक आहे. २० नोव्हेंबर २००७ रोजी १९५९ साली बालकांच्या हक्कांची घोषणा स्वीकारण्यात आली. बालहक्कांमध्ये जीवन, ओळख, अन्न, पोषण आणि आरोग्य, विकास, शिक्षण आणि मनोरंजन, नाव आणि राष्ट्रीयत्व, कुटुंब आणि कौटुंबिक वातावरण, दुर्लक्ष, गैरवर्तन, मुलांची अवैध तस्करी इत्यादीपासून संरक्षण यांचा समावेश होतो. भारतातील मुलांची काळजी आणि संरक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी मार्च २००७मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय बाल हक्कांच्या संरक्षणासाठी एक आयोग किंवा घटनात्मक संस्था तयार केली आहे. बालहक्कांबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी संस्था, सरकारी विभाग, नागरी समाज गट, स्वयंसेवी संस्था इत्यादींद्वारे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात.

बाल हक्क बालमजुरी आणि बाल शोषणाला विरोध करतात. जेणेकरून त्यांना त्यांचे बालपण, जीवन आणि विकासाचा हक्क मिळू शकेल. अत्याचार, तस्करी आणि हिंसाचाराचे बळी होण्यापेक्षा मुलांचे संरक्षण आणि काळजी घेतली पाहिजे. त्यांना चांगले शिक्षण, मनोरंजन, आनंद आणि शिकायला मिळावे. बाल हक्क दिन कसा साजरा केला जातो? यानिमित्ताने विविध समाजातील लोकांमध्ये बालहक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळांकडून मुलांसाठी कला स्पर्धा आयोजित केली जाते, बालहक्कांशी संबंधित कार्यक्रम आणि अनेक प्रकारचे कविता, गायन, नृत्य, इत्यादी केले जातात. त्यांच्या गरजांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि मुलाला एक व्यक्ती म्हणून समजून घेण्यासाठी एक कार्यक्रम देखील ठेवला जातो. या कार्यक्रम ातील सहभागी काही प्रश्न विचारतात. मुलांची एक व्यक्ती किंवा माणूस म्हणून ओळख असायला हवी. आनंदी आणि चांगले बालपण मिळवण्यासाठी त्यांना चांगले छप्पर, सुरक्षा, अन्न, शिक्षण,बालहक्कांचे संरक्षण सुनिश्चित कला, क्रीडा, काळजी, निरोगी कुटुंब, कपडे, मनोरंजन, वैद्यकीय दवाखाने, सम ुपदेशन केंद्र, वाहतूक, भविष्यातील नियोजन, नवीन तंत्रज्ञान इत्यादी उपलब्ध असणे आवश्यक आहे. कर्तव्य धारकाचा अभाव आणि बालकांच्या हक्कांचे महत्त्व याविषयी लोकांना जागरूक करण्यासाठी, हक्क धारक आणि कर्तव्य धारक यांच्यातील संबंध दर्शविणारे कला प्रदर्शन आयोजित केले जाते. बालहक्कांची ओळख करून दिल्यानंतरही सुरू असलेल्या समस्या समजून घेण्यासाठी, बालहक्कांवर आधारित मार्गापर्यंत पोहोचण्यासाठी चर्चासत्रे आणि वादविवाद आयोजित केले जातात. बालकांचे खरे हक्क मिळवण्यासाठी बालमजुरीच्या समस्येपासून मुक्ती मिळवणे गरजेचे आहे.

बाल हक्क दिन साजरा करण्याचा उद्देश- बालकांचे हक्क आणि सन्मान सुनिश्चित करण्यासाठी भारतात दरवर्षी बाल हक्क दिन साजरा केला जातो. त्यांना पूर्ण विकास आणि सुरक्षिततेचा आनंद घेण्याची संधी द्यायला हवी. बाल हक्कांचे कायदे, नियम आणि उद्दिष्टे यांचे पालन केले जात असल्याची खात्री करावी. बालहक्क बळकट करण्यासाठी सम ाजाला सातत्याने काम करावे लागेल. बाल हक्क योजनेचा देशभरात प्रचार आणि प्रसार करणे. देशाच्या प्रत्येक भागातील मुलांच्या राहणीमानाचे सखोल निरीक्षण करणे. वाढत्या मुलांच्या विकासात पालकांना मदत करणे. १८ वर्षाखालील मुलांच्या जबाबदारीची पालकांना जाणीव करून देणे. दुर्बल घटकातील मुलांसाठी नवीन बाल हक्क धोरण तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे. मुलांवरील हिंसाचार, अत्याचार रोखण्यासाठी, त्यांच्या चांगल्या भविष्यासाठी त्यांच्या सामाजिक आणि कायदेशीर अधिकारांना प्रोत्साहन देणे. देशात बाल हक्क धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या साधक आणि बाधकांचे विश्लेषण करणे. देशातील मुलांची तस्करी तसेच शारीरिक शोषणाविरुद्ध कारवाई आणि विश्लेषण करणे. बाल हक्क दिनाची गरज- हा प्रश्न आपल्या सर्वांच्या मनात निर्माण होतो की, बाल हक्क दिनाची गरज काय आहे, पण तसे नाही, त्याच्या गरजेला स्वतःचे महत्त्व आहे. बालहक्कांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी या दिवसाची स्थापना करण्यात आली. आजच्या काळात मुलांच्या आयुष्यात दुर्लक्ष, अत्याचाराच्या घटना खूप वाढल्या आहेत. स्वार्थापोटी बालमजुरी, बाल तस्करी असे गुन्हे करायला लोक मागेपुढे पाहत नाहीत. अशा परिस्थितीत मुलांना त्यांच्या हक्कांची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे जेणेकरून ते त्यांच्यासोबत होणाऱ्या कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा अत्याचाराविरुद्ध आवाज उठवू शकतील. यासोबतच बाल हक्क दिनाच्या या विशेष दिवशी शाळा, स्वयंसेवी संस्था आणि संस्थांकडून मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम ांचे आयोजन केले जाते, जसे की भाषण स्पर्धा, कला प्रदर्शन इत्यादी. जे हा संपूर्ण दिवस आणखी खास बनवण्याचे काम करण्यासोबतच मुलांच्या बौद्धिक विकासासाठीही उपयुक्त ठरते.

!! आंतरराष्ट्रीय बालहक्क दिनाच्या समस्त बालकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन -
श्री.कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी, गडचिरोली
फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.

पेटीबंद..

पुढा-यांचे भवितव्य
ई व्हीएम मध्ये बंद
कसा लागे निकाल
कुणाला नाही गंध

माहीत नाही कसा
आतून निघे समंध
युती आघाडी धर्म
अस्वस्थ हो संबंध

सुस्तव आरोप तोफ
गोळाफेक अंधाधुंद
अवनती खूप दिसे
डोळस सत्तेत अंध

बोलत राही सतत
वाचाळले अनिर्बंध
जरा होतीलं शांत
निखळून पडे बंध

जिंकून येऊ आम्ही
अज्ञाना असे आनंद
निकाल लागल्यावर
पुन्हा चाले रणकंद

निखळ वृत्ती हरवते
का नाही अद्वैतानंद
जयपराजय स्विकारे
जसा सुखावे मृदगंध

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

अक्षराज
अचूक वेध, अचाक बातमी

फ्लाईंग शीख मिल्खा सिंग

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांची आज जयंती. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली.

यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले.

१९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला.

त्यांच्या पत्नीचेही नुकतेच कोरोनाने निधन झाले आहे. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे प्रमुख पाकिस्तानचे माजी प्रमुख आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले ही स्पर्धा पाहण्यासाठी आयुब खान स्वतः हजर होते.

या स्पर्धेनंतरच आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला या चित्रपटात फरहान अखतर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे दोन वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले त्यांच्या त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली.

मिल्खा सिंग यांना जयंतीदिनी विनम्र आदरांजली!

- श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात

२२ लाख मतदार ठरवणार उमेदवारांचे भवितव्य मत पेटीत बंद

अक्षराज : हरी कापसे

दि.२०, तलासरी : आज दि.२० नोव्हेंम्बर २०२४ रोजी सकाळी ७ वाजेपासून ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान केंन्द्रावर मतदान करण्यासाठी प्रक्रिया सुरु झाली.जिल्ह्यातील सर्वत्र प्रचाराची रणधुमाळी सोमवारी संध्याकाळी ५ वा. संपली व मतदारांशी संपर्क व भेटीगाठी सुरु झाली. यावेळी पालघर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघात निवडणुकीच्या रिंगणात एकूण ५३ उमेदवार रिंगणात उभे आहेत. त्यात डहाणू मतदार संघात-८, विक्रमगड मतदार संघात-११, पालघर मतदार संघात-९, बोईसर मतदारसंघात- ६ नालासोपारा मतदारसंघात-१२ तर वसई मतदारसंघात-७ असे ५६ उमेदवार रिंगणात उभे आहे. २२ लाख ९२ हजार ६६ मतदार आहेत. हे एवढे मतदार ठरविणार आजच्या निवडणुकीत उमेवारांचे भवितव्य.

अभिजित पाटील यांनी कुटुंबीयांसह बजावला मतदानाचा हक्क

अक्षराज : विकास सरवळे

दि.२०, पंढरपूर : विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तसेच माढा विधानसभेचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांनी पंढरपूर तालुक्यातील मौजे देगाव या ठिकाणी आपल्या गावातील ग्रामदैवताचे आशीर्वाद घेऊन थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेऊन कुटुंबासमवेत मतदानाचा अधिकार बजावल्याचे दिसून आले त्यावेळेस अभिजीत पाटील यांच्यासह जयश्री पाटील सुमित्रा पाटील रेशमी पाटील अंजली पाटील अनुपमा पाटील अनुराधा पाटील स्वाती पाटील इत्यादींसह गावातील बहुसंख्येने नागरिक उपस्थित असलेले पहावयास मिळत होते.

यावेळेस माध्यमांशी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की माझ्या आयुष्यातला एक सुवर्णक्षण माझ्या आई-वडिलांचे आशीर्वाद माढा विधानसभा मतदारसंघातील जनतेचे माझ्यावर असणारे प्रेम शरद पवार यांचे माझ्यावर असलेले प्रेम जिल्ह्याचे नेते विजयसिंह मोहिते पाटील यांचा माझ्यावर असणारा विश्वास माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील या सर्व ज्येष्ठ नेत्यांच्या आशीर्वादामुळे मला माढा तालुक्यातील जनता प्रचंड बहुमताने निवडून देईल असा विश्वास त्यांनी आपल्या बोलण्यातून व्यक्त केला.

निफाडला कन्यारत्नाचे अनोख्या पध्दतीने स्वागत..

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.२०, निफाड (नाशिक) : निफाड येथिल प्रहार जनशक्ती पक्षाचे उपजिल्हाध्यक्ष सागर निकाळे व आरती सागर निकाळे यांना नुकतेच कन्यारत्न झाले असुन, त्यांनी मुलीच्या जन्माचे स्वागत एका अनोख्या स्वरुपात मोठ्या उत्साहाने केले. खरं तर सामाजिक स्तरावर बारकाईने बघितले तर मुलगा जन्माला आला कि मोठा उत्साह, आनंद नातेवाईक आप्तेष्ट साजरा करतात. परंतु तसाच आनंदउत्सव मुलगी जन्माला आल्यावर निकाळे परिवाराने केला आणि आपल्या कृतीतुन एक सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला. दारासमोर भव्य रांगोळी काढत स्त्री भृण हत्या थांबवा. लेक वाचवा. बेटी धनाची पेटी अशा प्रकारे रांगोळी एक सामाजिक संदेश या निमित्ताने दिला. तर माझी मुलगी माझा अभिमान. मुलगी शिकली प्रगती झाली अशा आशेयाचे फलक देखिल यावेळी दाखवुन मुलीच्या जन्माबाबत जनजागृती करण्यात आली. मुलगा मुलगी एक समान असुन कुणीही भेदभाव करु नये तसेच गर्भात होणाऱ्या मुलीच्या हत्या थांबल्या पाहीजे. स्त्री जन्माचे प्रमाण कुठेतरी पुरुष जन्माबरोबरीने पाहिजे .तुम्हाला आई पाहिजे, बहिण पाहिजे, मावशी पाहिजे, पण मुलगी नको अशा लोकांनी स्त्री जन्माचे स्वागत आदराने केलेच पाहिजे. असे आवाहन सागर निकाळे यांनी ह्याप्रसंगी केले. सर्वत्र फुलांचा वर्षाव करत मिठाईचे वाटप करुन जन्माला आलेल्या मुलीचे स्वागत निकाळे परीवाराकडुन करण्यात आले. या अनोख्या उपक्रमाची दखल घेत आमदार बच्चु कडु यांनी व्हिडीओ कॉलवर शुभेच्छा देत अभिनंदन केले.

याप्रसंगी निलेश निकाळे, सागर शिरसाठ, सचिन गाढे, दिगंबर वडघुले, विकास शिरसाठ, गणेश तुपलोंढे, प्रणित निकाळे, मंगल निकाळे, प्रियदर्शनी निकाळे, बेबीताई शिरसाठ, शांताबाई गांगुर्डे, संगीता तुपलोंढे, रुपाली शिरसाठ, उर्मिला शिरसाठ, प्रीती शिरसाठ, प्रिशा शिरसाठ, आदी मान्यवर उपस्थितीत होते. मुलीच्या जन्माचे या आगळ्या-वेगळ्या पध्दतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शोभाताई वच्छेवार यांचे निधन

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२०, मुदखेड (नांदेड) : उमरी तालुक्यातील हुंडा येथील रहिवासी श्रीमती शोभाताई गंगाधरराव वच्छेवार यांचे दि.२० नोव्हेंबर रोजी दीर्घ आजाराने आज सकाळी ८:०० वाजता निधन झाले.त्यांचे मृत्यू समयी वय ७३ वर्ष होते त्यांच्या पश्चात सुन व नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या पार्थिव देहावर आज सायंकाळी ५ वाजता हुंडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दैनिक प्रजावाणी व सामना चे मुदखेड प्रतिनिधी ईश्वर पिन्नलवार यांची त्या थोरल्या बहीण होत्या.

नाशिक जिल्ह्यात पाच वाजेपर्यंत झालेले मतदान

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.२०, विंचूर (नाशिक) : नाशिक जिल्ह्यातील १५ विधानसभा मतदार संघात सकाळी सात वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली. काही ठिकाणी किरकोळ घटना वगळता सर्वत्र शांततेत मतदान सुरू आहे. नाशिक जिल्ह्यातील १५ विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीत ५० लाख ६१ हजार १८५ मतदारांनी नोंदणी केली असून जिल्ह्याची मतदार टक्केवारीचे ७५+ हे उद्दिष्ट साध्य करण्याचे प्रयत्न केले जात आहे. बुधवार मतदानासाठी शासनाने सुट्टी घोषित केली आहे. सकाळी सात ते नऊ पर्यंत ६.९३, ९ ते ११ १८.८२ तर ११ ते १ पर्यंत ३२.३५ तर तीन वाजेपर्यंत ४७.११ सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६०.११ टक्के मतदान झाले आहे. जिल्ह्यात कळवण मध्ये सर्वाधिक मतदान झाले आहे. तसेच विंचूर येथे सूत्रांकडून असे कळले की साधारण ८० टक्के झाले व काही बुथवर मतदान उशिरापर्यंत चालू होते. **नांदगाव ५९.९३, मालेगाव मध्य ६१.९८, मालेगाव बाह्य ५७.५६, बागलाण ५३.८४, कळवण ७०.३५, चांदवड ६५.०१, येवला ६८.६९, सिन्नर ६३.८५, निफाड ६३.२५, दिंडोरी ७१.९७, नाशिक पूर्व ४९.६, नाशिक मध्य ५१.४९, नाशिक पश्चिम ५०.३९, देवळा ५५.०८, इगतपुरी ६९.३९ एकूण मतदान ६०.११**

दूरदर्शन : एक दृकश्राव्य माध्यम !

जागतिक दूरदर्शन दिन- वर्ल्ड टेलिव्हिजन डे दरवर्षी २१ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. त्याचा शोध लागल्यापासून, टेलिव्हिजन हे सामान्य लोकांच्या जीवनातील मनोरंजनाचे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे. दूरचित्रवाणीच्या माध्यमातून लोक अनेक वर्षांपासून शिक्षण, बातम्या, राजकारण, मनोरंजन आणि गप्पांचा आनंद घेत आहेत.

जागतिक दूरचित्रवाणी दिन साजरा करण्याचा उद्देश जगभरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणांपलीकडे दूरदर्शनचे महत्त्व पटवून देणे हा आहे. जागतिक दूरचित्रवाणी दिन हा केवळ उपकरणांचा उत्सव नसून दूरदर्शनमागील तत्त्वज्ञान आहे. टेलिव्हिजनचा शोध लागल्यापासून ते मनोरंजनाचा एक मुख्य स्रोत बनले आहे. लोकांचे मनोरंजन करण्यात सोबतच लोकांपर्यंत माहिती, शिक्षिण आणि प्रसारित करण्यात टेलिव्हिजनने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या लेखात, तुम्हाला जागतिक दूरचित्रवाणी दिनाचा इतिहास, महत्त्व आणि महत्त्वाच्या तथ्यांबद्दल माहिती मिळेल. का साजरा केला जातो जागतिक दूरदर्शन दिन? त्याचा शोध लागल्यापासून दूरदर्शन हे लोकांसाठी मनोरंजनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. दि.१५ सप्टेंबर १९५९ रोजी भारतात पहिल्यांदा टेलिव्हिजन लाँच करण्यात आले.

त्यावेळी दूरचित्रवाणीने देशाला एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्या काळात हम लोग, बुनियाद, रामायण आणि महाभारत यांसारखे लोकप्रिय शो टेलिव्हिजनवर यायचे, ते पाहण्यासाठी टीव्हीच्या पडद्यासमोर लोकांची गर्दी व्हायची. म्हणूनच केवळ इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या पलीकडे जनमताची मांडणी करण्याची ताकद असलेल्या शिक्षणाचा स्रोत म्हणून टेलिव्हिजनचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी जागतिक दूरदर्शन दिनाची स्थापना केली. जागतिक दूरदर्शन दिन दरवर्षी कोणत्याही विशिष्ट थीमसह साजरा केला जात नाही.

यामध्ये विविध विषयांवर चर्चा करून, त्याची सोडवणूक केली जाते.

वर्षानुवर्षे, टेलिव्हिजनचा एक अद्वितीय जागतिक व्यासपीठ म्हणून वापर करणे, सांस्कृतिक सहअस्तित्व आणि बंधुत्वाच्या माध्यमांना प्रोत्साहन देणे, विविध संस्कृतींच्या लोकांमधील दरी कमी करणे आणि राष्ट्राच्या भल्यासाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन देणे, ही भूमिका भौगोलिक कार्यात दूरदर्शन इत्यादी चर्चेचा एक भाग आहे. जागतिक दूरदर्शन दिनाची पार्श्वभूमी- संयुक्त राष्ट्रांनी डिसेंबर १९९६ मध्ये २१ नोव्हेंबर हा जागतिक दूरचित्रवाणी दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. त्यात झालेल्या पहिल्या वर्ल्ड टेलिव्हिजन फोरमच्या स्मरणार्थ दरवर्षी २१ नोव्हेंबर रोजी जागतिक दूरदर्शन दिन साजरा केला जातो. लोकांच्या निर्णयक्षमतेवर दृकश्राव्य माध्यमांचा वाढता प्रभाव आणि इतर प्रमुख मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्यात त्याची संभाव्य भूमिका ओळखण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी नंतर एक ठराव स्वीकारला. त्यामुळे जनमताची माहिती, व्यवस्था आणि प्रभाव पाडण्याचे प्रमुख साधन म्हणून दूरदर्शन स्वीकारले गेले. दूरचित्रवाणी देखील आज संप्रेषण आणि जागतिकीकरणाचे प्रतिनिधित्व करते.

जागतिक दूरदर्शन दिनाचे महत्त्व- युनायटेड नेशन्स-युएनने ही कल्पना लोकप्रिय केली की, टेलिव्हिजन हे समकालीन जगात जागतिकीकरण आणि संवादाचे प्रतीक आहे. लोकांच्या मनोरंजनासोबत कुटुंबाला एकत्र ठेवण्यासाठी टेलिव्हिजनने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दूरचित्रवाणीने कुटुंबातील सदस्यांना एकमेकांच्या जवळ आणले. दूरदर्शन हे माहिती आणि शिक्षणाचे प्रमुख स्रोत आहे, ते लोकांच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेवर देखील प्रभाव टाकते. कारण ते जगात होत असलेल्या संघर्षांकडे लोकांचे लक्ष वेधून घेते. जागतिक दूरचित्रवाणी दिन देखील समाजावर परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या समस्या आणि घटनांबद्दल निःपक्षपाती माहिती प्रदान करण्यासाठी, दूरचित्रवाणी माध्यमांच्या विकासाला पाठिंबा देण्यासाठी सरकार, संस्था आणि व्यक्तींच्या भूमिकेचे कौतुक करण्यासाठी साजरा केला जातो.

दूरदर्शन आणि त्याचा शोध- टेलिव्हिजन हे प्रसारण माध्यम म्हणून परिभाषित केले आहे. यामध्ये प्रतिमा किंवा चित्रे विद्युत सिग्नलमध्ये रूपांतरित केली जातात, जी नंतर निवडक माध्यमावर प्रसारित केली जातात आणि प्रतिमा योग्य बाह्य स्क्रीनवर प्रदर्शित केल्या जातात. सन १९२४मध्ये स्कॉटिश अभियंता जॉन लोगी बेयर्ड यांनी टेलिव्हिजनचा शोध लावला होता. युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशनच्या सहकार्याने भारतात सन १९५९मध्ये नवी दिल्ली येथे टेलिव्हिजनची सुरुवात झाली. सन १९९१च्या आर्थिक सुधारणा होईपर्यंत सरकारी मालकीचे दूरदर्शन हे एकमेव राष्ट्रीय चॅनेल राहिले होते. त्यानंतर खाजगी आणि परदेशी प्रसारकांना मर्यादित ऑपरेशन्समध्ये गुंतण्याची परवानगी देण्यात आली.

!! आंतरराष्ट्रीय टीव्ही दिवसाच्या सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन -

श्री.कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.

गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३

महाबळेश्वर येथे विधनसभा मतदान उत्साह पुर्ण वातावरणात संपन्न

अक्षराज : रियाज मुजावर

दि.२०, महाबळेश्वर : वाई - खंडाळा महाबळेश्वर विधानसभा निवडणूक २० नोव्हेंबरला (बुधवार) पार पडली. यामध्ये महाबळेश्वर नगरपालिका क्षेत्रातील एकूण मतदार १२५८९ पैकी७४०१ मतदारांनी आपल्या मतदानाचा अधिकार बजावला एकूण मतदान ५९.३४% झाले.

सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. यावेळी मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाने वेगवेगळे प्रयत्न केले होते. या मध्ये दिव्यांग व वृद्ध तसेच महिला व पुरुष मतदारांनीआपला मतदानाचा हकक बजावला. गिरिस्थान शाळा क्र १, २ व ३ व गिरिस्थान प्रशाला येथे मतदारांनी मतदान केले. दोन्ही प्रमुख पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते विद्यमान आमदार मकरंद पाटील यांनी मतदान केंद्रावर भेटी घेतल्या महाबळेश्वरयेथील मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. महायुती व महाविकास आघाडीच्या कार्यकत्यांनी विशेष मेहनत घेतली ही मतदान प्रक्रिया पार पाडण्यात मुख्याधिकारी योगेश पाटील, मुख्य लिपिक आबाजी ढोबळे तसेच सहाय्यक निबंधक अनुराधा पंडीतराव यांच्या मार्गदर्शना खाली निवडणुक अधिकारी तसेच कर्मचारी यांनी सदरची मतदानाची प्रक्रिया यशस्वी रित्या पार पाडली.

प्रितगंध फाऊंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त कविसंमेलन

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२०, मुंबई : प्रितगंध फाऊंडेशन मुंबई च्या ९ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय कविसंमेलन, पुरस्कार वितरण व भव्य प्रकाशन सोहळा प्रमुख पाहुणे सन्माननीय महेश लोंढे सामाजिक कार्यकर्ते, प्रकाश टाकळे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, डॉ.शितल मालुसरे, नरवीर तानाजी मालुसरे यांच्या बाराव्या वंशजा ,डॉ अलका नाईक, मानसतज्ञ, सामाजिक कार्यकर्त्या, कवयित्री, संतोष तावडे, गझलकार, गुरुदत्त वायकर, कवी तसेच अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. सन्मा जगन्नाथ सुरवाडे यांच्या संदेश

भीमाचा, व सुगंध तसेच मंगेश रेडीज यांच्या काव्य झरा व सहज सुचलेले शब्द या चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.तसेच अनेक सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक व कला पुरस्कार देण्यात आले. संपुर्ण महाराष्ट्रातुन पासष्ट कविंनी आपल्या सुंदर रचना सादर केल्या. यातुन पाच पाच बक्षिसपात्र कविता कवितांना रोख रक्कम, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विशेष बाब आणि योगायोग म्हणजेच धर्मवीर १ व धर्मवीर २ मधिल बाळासाहेब ठाकरे यांची भुमिका करणारे सिने अभिनेता मकरंद पाध्ये हे सुद्धा हजर होते आणि दुसरा योगायोग म्हणजे एक तासात फाडफाड इंग्लिश बोलायला शिकवणारे कोकाटे क्लास चे मालक महादेव कोकाटे हे ही हजर होते. प्रितगंध फाऊंडेशन मुंबई च्या अनेक सामाजिक उपक्रमाची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन सन १०२२-२३ चा युवा जिल्हा पुरस्कार संस्था पुरस्कार बहाल केला.

पारनेर विधानसभा खा. निलेश लंके यांच्या प्रतिष्ठेची तर विरोधकांसाठी अस्तित्वाची...

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२०, अहिल्यानगर : पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघामध्ये ११ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. खरी लढत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्येच होणार आहे. मात्र अपक्ष उमेदवारांची संख्या अधिक असल्याने निवडणुकीमध्ये मोठी चुरस निर्माण होणार आहे. अपक्ष उमेदवार कोणाला तारणार अन् कोणाला पाडणार, हे मात्र निकालानंतरच समजणार आहे. पारनेर विधानसभेसाठी २२ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले होते. अर्ज छाननीच्या दिवशी शंकर प्रसाद गंधे यांचा अर्ज अवैध ठरला होता.

त्यामुळे २० उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले होते. शेवटी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी आठ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने निवडणूक रिंगणात बारा उमेदवार राहिले आहेत. ते आपले नशीब आजमावत आहेत. पारनेर विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवार राणी लंके आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्यातच खरी लढत होत आहे. अपक्ष उमेदवार माजी आमदार विजय भास्कर औटी आणि माजी नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी, तसेच शिवसेनेचे संदेश कार्ले यांच्यामुळे निवडणुकीमध्ये मोठी चुरस निर्माण झाली आहे. अपक्ष उमेदवार दोन्ही विजय औटी आणि संदेश कार्ले हे किती मते घेणार,त्याचा परिणाम कोणाला भोगावा लागणार, हे आत्ताच सांगणे कठीण आहे. यापूर्वी लोकसभेच्या वेळी खासदार निलेश लंके यांच्या सोबत असलेले कार्ले आता लंके यांच्या विरोधात आहेत. तसेच ते अहिल्यानगर तालुक्यातील आहेत. पारनेर विधानसभा मतदारसंघात अहिल्यानगरचे दोन जिल्हा परिषद गट आहेत. त्यामुळे हे मतदार स्थानिक उमेदवार या नात्याने कार्ले यांच्याकडे काही अंशी झुकल्याशिलाय राहणार नाहित. त्यामुळे त्याचा मोठा फटाका लंके यांनाच बसणार असल्याची चर्चा आहे. असे असले, तरी राणीताई लंके यांचे माहेर ही कार्ले यांच्या गावाशेजारीच आहे. त्यामुळे आपली लेक आमदार होणार असल्याच्या भावनेने या गटातील काही मते लंके यांना मिळू शकतात. दोन्ही विजय औटी यांच्या उमेदवारीचा फटका लंके यांच्यापेक्षा काशिनाथ दाते यांना अधिक बसेल कारण लोकसभेच्या वेळी लंके यांच्या विरोधात दाते आणि विजय सदाशिव औटीसह महायुतीच्या पदाधिकार्यांनीही काम केले होते. तसेच माजी आमदार विजय औटी हेही लंके यांच्या सोबत नव्हते. त्यामुळे या दोघांच्या अपक्ष उमेदवारीचा फटका हा लंके यांच्यापेक्षा काशिनाथ दाते यांनाच अधिक बसण्याची शक्यता आहे. दाते यांच्याबरोबर आता असलेल्या काहींनी दाते यांना अविभाजीत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपद दिले, तेव्हा थयथयाट केला होता. त्या त्राग्यातूनच दाते यांनी पक्ष सोडला होता. आता तेच दाते राष्ट्रवादी फुटीनंतर उमेदवारीसाठी अजित पवार गटात आले. तालुक्यातील मतदार सुशिक्षित आहेत. पारनेर तालुक्यातील अनेक मतदार मुंबईकर आहेत. त्यांच्या मताचे व्यवस्थापन हा निवडणूकीतील कळीचा मुद्दा आहे. खासदार निलेश लंके व प्रतिष्ठानचे कार्यकर्ते हे नियोजनात त्याबाबतीत कुणालाही ऐकणार नाहीत. पारनेर विधानसभेची निवडणूक ही खासदार निलेश लंके यांच्या प्रतिष्ठेची तर विरोधकांसाठी अस्तित्वाची झाली आहे.

विशेष म्हणजे मतदारसंघात ही लढाई राष्ट्रवादीच्या दोन्ही गटात आहे. खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके या निवडणूक रिंगणात असल्याने ही लढत लंके यांच्यासाठी प्रतिष्ठेची झाली आहे, तर महायुतीकडून अजित पवार गटाचे काशिनाथ दाते व काही प्रमुख अपक्ष असून त्यांच्यासाठी अस्तित्वाची ही लढत झाली आहे. मागील लोकसभेला लंके यांनी डॉ. सुजय विखे यांचा मोठा पराभव केला होता. विरोधात मोठी टीम एकत्र येऊनही मनोमिलना अभावी ते लंके यांना रोखू शकले नव्हते. पारनेर विधानसभा निवडणुकीत तालुक्यातील विकास कामे,रस्ते, वीज, पाणी,पठार भागाला शेतीसाठी पाणी,सुपे औद्योगिक वसाहतीतील ठेकेदारी, बेरोजगारी,सुपे परिसरातील अतिक्रमणे हे महत्त्वाचे मुद्दे असले, तरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात पतसंस्था बुडाल्या आहेत. या संस्था कोणी बुडवल्या,कोणी मोडून खाल्ल्या,कोणी गोरगरीब जनतेच्या पैशावर राजकारण केले, सत्ता भोगल्या आणि कोणी कोणाला राजाश्रय दिला. याच्या चर्चा गावागावात रंगत आहेत. हे प्रमुख मुद्दे प्रचारात गाजत असून मतदार कोणाला पसंती देणार हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

टाकळी ढोकेश्वरमध्ये ७० टक्के मतदान; सायंकाळी ६ पर्यंत मतदार रांगेत

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) : पारनेर तालुक्यात विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी दि.२० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली होती. तालुक्यातील अनेक ठिकाणी मतदान करण्यासाठी मतदारांमध्ये उत्साह दिसून येत होता. तालुक्यातील महत्त्वाचे ठिकाण असलेल्या टाकळीढोकेश्वर,भाळवणी, ढवळपूरी, सुपा येथे म तदानासाठी रांगा लागलेल्या असल्याचे पाहायला मिळाले. टाकळी ढोकेश्वर या ठिकाणी दुपारी ३.३० वाजेपर्यंत ४३८९ मतदानापैकी २०२३ मतदान म्हणजे ४६.१० टक्के मतदान घडले होते.

मतदानाचा वेग थोडा मंद जाणवत होता. म तदान समाप्तीला ३ तास शिल्लक राहिल्याने कार्यकर्ते जास्तीत जास्त मतदान घडून आणण्यासाठी धावपळ करताना दिसून आली. अनेक ठिकाणी बाहेरगावाहून मतदार बोलावून घेतल्याचे दिसून येत होते. दरम्यान, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी संपूर्ण मतदार संघातील मतदान केंद्रांना भेटी देत परिस्थितीची माहिती घेतली. वरिष्ठ निवडणूक अधिकाऱ्यांनी अनेक मतदान केंद्रांना भेटी दिल्या. काही ठिकाणी तांत्रिक बिघाड वगळता दुपारी ३ वाजेपर्यंत शांततेत मतदान चालू होते. शेतकऱ्यांनी शेती कामानिमित्ताने अनेक मतदारांनी सकाळीच मतदान करण्याला प्राधान्य दिलेले दिसत होते.

सायंकाळी ६ वाजेपर्यंत ७०.३६ टक्के मतदान झाले असून मतदारांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी ढोकेश्वर मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी उशिरापर्यंत रांगा लागल्या होत्या. वार्ड क्रं ७८ - ७३६, ७९- ६१०,८०- ६६७,८१- ८३५, निवडुंगेवाडी ८२- २७७ पोस्टल मतदान २७६ एकूण मतदानापैकी ४७६४ पैकी ३१२५ म तदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

लोकसभा पोटनिवडणुकीसाठी ५ पर्यंत ५३.७८ तर विधानसभेसाठी ५५.८८ टक्के मतदान

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२०, नांदेड : नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व ९ विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ३ हजार ८८ मतदान केंद्रावर शांततेत मतदान पार पडले. मतदारांनी मतदान केंद्रावर सकाळी ७ वाजेपासून लांबच लांब रांगा लावल्या होत्या. दिव्यांग, जेष्ठ मतदारासोबत नवमतदार आणि तृतीयपंथीयांनी म तदानासाठी उपस्थिती लावली. यावर्षी २५ वर्षानंतर एकाच वेळी लोकसभा व विधानसभेसाठी एकाच शाईत दोन मतदान करण्याचा अनुभव मतदाराना मिळाला. या निवडणुकीत लोकसभेसाठी १९ तर विधानसभेसाठी १६५ उमेदवारांचे भविष्य आज मतदान यंत्रात बंद झाले आहे. या लोकसभेसाठी १९ लाखांच्यावर व विधानसभेसाठी २७ लाखांच्यावर म तदारांचा समावेश आहे. आज सकाळी नांदेड जिल्ह्यामध्ये सकाळी ७ वाजता म तदानाला सुरुवात झाली. काही ठिकाणी सकाळपासूनच मतदानासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

नांदेड लोकसभेसाठी आज सकाळी ९ वाजता ६.०३ तर विधानसभेसाठी ५.४२ टक्के मतदान झाले. सकाळी नांदेड मतदार संघातील लोकप्रतिनिधीनीसह अनेक मान्यवरांनी मतदानाचा हक्क बजावला. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सहकुटूंब व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनीही आयटीआय परिसरातील कामगार कल्याण केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. नवमतदार, जेष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक, तृतीयपंथीय यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून त्यांनी मोठया प्रमाणात म तदानाचा हक्क बजावला. सकाळी ११ वाजेपर्यत लोकसभेसाठी १२.५९ तर विधानसभेसाठी १३.६७ टक्के मतदान झाले. आज दुपारी १ वाजता २७.२५ तर विधानसभेसाठी २८.१५ टक्के मतदान झाले. दुपारी ३ वाजेपर्यत लोकसभेसाठी ४१.५८ तर विधानसभा क्षेत्रात ४२.८७ टक्के मतदान झाले होते. सायं. ५ वाजेपर्यत ही आकडेवारी लोकसभेसाठी ५३.७८ तर विधानसभेसाठी ५५.८८ एवढी होती. रात्री उशिरा अधिकृत अंतिम आकडेवारी मिळण्याची शक्यता आहे.

या निवडणुकीसाठी गेल्या ४० दिवसापासून जिल्हा प्रशासन कार्यरत आहे. १५ हजार कर्मचारी तसेच पोलीस व राखीव दलाच्या तुकडया गेल्या काही दिवसांपासून कार्यरत होत्या. आज दिवसभर वॉररुम व वेबकास्टिंग कक्षाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत निवडणूक आयोग व सामान्य म तदार यांच्या संपर्कात होते. वेब कास्टिंग विभागात वरिष्ठ अधिकारी निगराणी ठेवून होते. रात्री उशिरापर्यत या यंत्रणेमार्फत अनेक ठिकाणच्या मतदान केंद्रावर ते लक्ष ठेवून होते. आज दिवसभर इव्हिएम व अन्य कोणतीही अडचण आल्यास तातडीने विशिष्ट वेळात समस्या सोडवली जात होती. विधानसभा निहाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या संपर्कात ते होते. मतदान यंत्राच्या बदलाच्या एक दोन घटना वगळता जिल्ह्यामध्ये कुठेही मतदान थांबले नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी यासोबत अनेक केंद्राना अनेक ठिकाणी आकस्मिक भेटी दिल्या.तसेच याकाळात निवडणूक निरीक्षकांनी देखील भेटी दिल्या व परिस्थितीवर लक्ष दिले. रात्री उशिरा नेमकी मतदानाची टक्केवारी पुढे येणार आहे. तत्पुर्वी सन २०१९ च्या विधानसभा मतदारसंघात किनवट ७०.९०, हदगाव ७०.२०, लोहा ६९.७३ भोकर-७३.९९, नांदेड उत्तर ६१.२०, नांदेड दक्षिण-६३.६६, नायगाव ७३.८०, देगलूर ६०.८०, म ुखेड ६६.२० असे एकूण ६७.८३ टक्के म तदान झाले होते. यावेळी देखील मोठया संख्येन मतदान होण्याची अपेक्षा आहे.

यावर्षी निवडणूक विभागाने प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये म हिला, दिव्यांग व तरुण अधिकाऱ्यांचे मतदान केंद्र उभारले होते. याशिवाय ५३९ पर्दानसिन केंद्र कार्यरत करण्यात आले होते. यासोबतच विष्णुपुरी जि.प. शाळेत पर्यावरण पूरक केंद्र उभारले होते. मात्र सोबतच प्रशासनाने यावेळी प्रत्येक केंद्रामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या होत्या. यामध्ये पिण्याचे पाणी, दिव्यांगासाठी रॅम, दिवाबत्ती, बसण्याची व्यवस्था, काही केंद्रावर सेल्फी पॉईट व अन्य सजावट करण्यात आली होती. मतदारांनी एकाच वेळी दोन ठिकाणी गतीने मतदान झाल्याबद्दल लोकसभा मतदार संघात समाधान व्यक्त केले. म ोठया संख्येन जनतेने मतदानाला प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा प्रशासनाने मतदाराचे आभार व्यक्त केले आहे. जिल्ह्यामध्ये याकाळात कोणत्याही अप्रिय घटनेची नोंद नाही.

२३ नोव्हेंबरला मतमोजणी

आज मतदान पार पडल्यानंतर दोन दिवसांनी २३ नोव्हेंबरला शनिवारी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात होणार असून किनवटला आयटीआय कॉलेजमध्ये, हदगावला समाज कल्याण भवन येथील अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय वसतीगृह तर लोहा येथे महसूल हॉल, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

५ वाजेपर्यंत जिल्ह्यात सरासरी ५७.४२ टक्के मतदान

युवा, दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांचा उत्साह वाखाणण्याजोगा

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२०, वाशिम : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर रोजी जिल्ह्यात ३ विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पडली. ५ वाजेपर्यंत जिल्ह्यात सरासरी ५७.४२ टक्के मतदान झाले. शनिवार, २३ नोव्हेंबर रोजी तिन्ही विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर मतमोजणी केली जाणार असून याकरिता प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी बुवनेश्वरी एस यांनी दिली. जिल्ह्यात ३३ रिसोड विधानसभा मतदारसंघात पुरुष १ लक्ष ६८ हजार ६६२, महीला १ लक्ष ५५ हजार ७३०, असे एकूण ३ लक्ष २४ हजार ३९२, ३४ वाशिम विधानसभा मतदारसंघात पुरुष १ लक्ष ९१ हजार १२७, महीला १ लक्ष ७७ हजार ३३७ असे एकूण ३ लक्ष ६८ हजार ४७४, ३५ कारंजा विधानसभा मतदारसंघात

पुरुष १ लक्ष ६२ हजार ६९, महिला १ लक्ष ५४ हजार १६३ असे एकूण ३ लक्ष १६ हजार २४१ मतदार असून जिल्ह्यात ५ लक्ष २१ हजार ८५८ पुरुष, ४ लक्ष ८७ हजार २३० महिला व १९ तृतीयपंथी असे एकूण १० लक्ष ९ हजार १०७ मतदार आहेत.

३३ रिसोड विधानसभा मतदारसंघात ५ वाजेपर्यंत ६०.१८ टक्के, ३४ वाशिम विधानसभा मतदारसंघात ५६.८७ टक्के आणि ३५ कारंजा विधानसभा मतदारसंघात ५५.२२ टक्के मतदान झाले आहे. जिल्ह्यात एकूण ५७.४२ मतदान झाले. जिल्ह्यातील एकूण १० लक्ष ९ हजार १०७ मतदारांपैकी ५ लक्ष ७९ हजार ३९१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला.

मतदारांचा उत्साह वाढविण्यासाठी आकर्षक रांगोळ्या काढून मतदान केंद्रांचे सजावटी करण करण्यात आले होते.

मतदारांसाठी सुविधा

मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, मतपत्रिका, स्वयंसेवक आदी किम ान सुविधा पुरविण्यात आल्या. सर्व मतदान केंद्रांवर दिव्यांग तसेच वयोवृद्ध मतदारांकरिता व्हीलचेअर व रॅम्पची व्यवस्था करण्यात आली. तसेच दिव्यांग बांधवांसाठी, ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी स्वयंसेवक नियुक्त केले होते.

वेब कास्टिंगद्वारे थेट नजर

जिल्ह्यातील ५५२ मतदान केंद्रांवरील मतदान प्रक्रियेवर 'वेब कास्टिंग' द्वारे थेट नजर ठेवण्यात आली. मतदान केंद्रांवर 'सीसीटीव्ही'द्वारे निवडणूक यंत्रणेने थेट नजर ठेवत वेळोवेळी आढावा घेतला.

शनिवारी होणार मतमोजणी

जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा म तदारसंघांच्या निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर शनिवार २३ नोव्हेंबर रोजी मतम ोजणी होणार आहे. रिसोड येथील मतमोजणी तहसील कार्यालय प्रशासकीय इमारत येथे, वाशिम येथील मतमोजणी बसस्थानक जवळील कोरोनेशन क्लब येथे तर कारंजा येथील मतमोजणी कृषि उत्पन्न बाजार समितीमधील शेतकरी निवास गोडाऊनमध्ये होणार आहे.

राजू पाटील, सुभाष भोईर, राजेश मोरे या उमेदवारांनी मतदानाचा हक्क बजावला

अक्षराज : विनोद वास्कर

दि. २०, कल्याण (ठाणे) : २० नोव्हेंबर २०२४ रोजी कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मनसेचे उमेदवार प्रमोद राजू पाटील यांनी काटई जिल्हा परिषदेच्या शाळेत बजावला म तदानाचा हक्क

डोंबिवली विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार रवींद्र चव्हाण यांनी आपल्या कुटुंबासह म तदानाच्या हक्क बजावला.

कल्याण ग्रामीण विधानसभा म तदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सुभाष गणू भोईर आणि त्यांच्या परिवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या शिळगाव येथील शाळेत मतदानाचा हक्क बजावला.

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार राजेश मोरे यांनी आपल्या कुटुंबासह डोंबिवली पश्चिमेकडील मोठा गाव येथील पालिकेच्या शाळेत मतदानाचा हक्क बजावला. ग्रामीण भागातील मतदार मोठ्या संख्येने मतदान करण्यासाठी म तदान केंद्रावर पोहोचत आहेत. मतदारांना मदत केंद्रावर पोचण्यासाठी तीस रिक्षांची ही सोय करण्यात आली आहे. नेहमी ज्या केंद्रावर मतदान करत होते यावेळी दुसऱ्या ठिकाणी वोटिंग करण्यासाठी जावे लागत असल्यामुळे मतदारांना थोडा त्रास होत आहे. पण मतदार हे वोटिंग साठी घरातून मोठ्या संख्येने निघत आहेत.

थोडक्यात

जिल्हाधिकाऱ्यांनी बजावला मतदानाचा हक्क

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२०, वाशिम : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज सकाळी ७ वाजेपासून मतदान प्रक्रियेस उत्साहात सुरुवात झाली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी बुवनेश्वरी एस यांनी लॉयन्स विद्यानिकेतन मतदान केंद्रावर आपला म तदानाचा हक्क बजावला.

मतदारांनो ! मी मतदान केले. आपण ही राष्ट्रहिताच्या दृष्टीने मतदानाचा हक्क पार पाडावा. असे आवाहन केले. यावेळी बुवनेश्वरी एस यांनी मतदान केंद्रातील केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांच्याशी संवाद साधून मतदान प्रक्रियेबाबत माहिती घेतली. तसेच मतदानासाठी आलेल्या मतदारांशी देखील त्यांनी संवाद साधत मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी मतदान केंद्रावर युवा म तदारासह ज्येष्ठ मतदार आणि महिला मतदार देखील उत्साहाने आपला मतदानाचा हक्क बजावताना दिसून आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सेल्फी सुद्धा काढला. आणि मतदारांसमवेत सेल्फी काढून उपस्थित मतदारांचा उत्साह वाढविला.

सोलापूर जिल्ह्यात सायंकाळी ५ वाजेपर्यंत सरासरी ५७.०९ टक्के मतदान

अक्षराज : विकास सरवळे

दि.२० , पंढरपूर : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २० नोव्हेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात आज मतदान घेण्यात आले. जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात सायंकाळी पाच वाजेपर्यंत सरासरी एकूण ५७.०९ टक्के मतदान झालेले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्ह्यात एकूण ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदार असून आज सकाळी सात ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत २१ लाख ९७ हजार २३६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावलेला आहे. यामध्ये पुरुष मतदार अकरा लाख तीस हजार ९०६, स्त्री मतदार दहा लाख ६६ हजार २३१ तृतीयपंथी ६९ मतदाराने मतदान केलेले आहे. मतदानाची एकूण सरासरी ५७.०९% झालेली आहे.

विधानसभा निहाय झालेले एकूण मतदान व मतदानाची टक्केवारी खालील प्रमाणे...

२४४ करमाळा विधानसभा मतदारसंघात एकूण एक लाख ९४ हजार १० म तदारांनी मतदान केले (५८.५७%).

२४५ माढा विधानसभा मतदारसंघात एकूण दोन लाख चार हजार ५४१ मतदारांनी मतदान केले, ५७.९९%.

२४६ बार्शी विधानसभा मतदारसंघात दोन लाख दहा हजार ८६० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला मतदानाची टक्केवारी ६२.४८%.

२४७ मोहोळ अनुसूचित जाती विधानसभा मतदारसंघात एक लाख ९८ हजार ३३८ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ५९.८४% आहे.

२४८ सोलापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात एकूण एक लाख ६८ हजार २९ मतदारांनी मतदान केले असून ५१. ४९ टक्के मतदान झालेले आहे.

२४९ सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघात एकूण ११९३७ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची सरासरी ४९.६०% आहे.

२५० अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात एकूण २०२६२ मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी ५८.४८% आहे.

२५१ सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात एकूण एक लाख ९८ हजार ७९० मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ५१.९४ टक्के आहे.

२५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख २ हजार ४४६ मतदारांनी मतदान केलेले आहे. मतदानाची टक्केवारी ५४.१८.

२५३ सांगोला विधानसभा मतदारसंघात एकूण २,१४,४२३ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ६४.३०% आहे.

२५४ माळशिरस अनुसूचित जाती मतदार संघात एकूण २,०९,४०० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्या असून मतदानाची सरासरी टक्केवारी ५९.९०% आहे.

पैसे वाटप संशयावरून कोपरखैरणेत हाणामारी

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२०, नवी मुंबई : विधानसभा निवडणूक मतदान प्रक्रिया संपण्यास काही तास राहिले असता स्वराज्य पक्ष आणि भाजप कार्यकर्त्यात हाणामारी झाली आहे. सेक्टर पाच येथील माजी नगरसेवक शंकर मोरे यांच्या कार्यालयासमोर सदर प्रकार घडला असून अद्याप कोणावर अटकेची कारवाई झालेली नाही.

मतदान संपण्यास काही तास राहिले असता भाजपा उमेदवार गणेश नाईक यांचे समर्थक माजी नगरसेवक शंकर मोरे यांच्या कार्यालयातून पैसे वाटप होत असल्याच्या संशयावरून स्वराज पक्षाचे उमेदवार अंकुश कदम यांचे कार्यकर्ते निवडणूक आयोगाच्या भरारी पथकासह सेक्टर पाच येथील मोरे यांच्या कार्यालयात दाखल झाले. कार्यालय बाहेर टेबल मांडून मतदारांना यादी क्रमांक, बूथ क्रमांक आदींची माहिती दिली जात होती याच ठिकाणी स्वराज पक्ष कार्यकर्ते आणि भाजप कार्यकर्ते पोलिसांच्या देखत बाचाबाची करत एकमेकांना भिडले. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. सुरवातीला बाचाबाची झाली. मात्र नंतर अचानक कार्यकर्ते एकमेकांना भिडले. या बाबत स्वराज पक्षाचे उमेदवार अंकुश कदम यांना विचारणा केली असता मोरे यांच्या कार्यालयातून पैसे वाटप होत असल्याची माहिती आम्हाला मिळाली. या माहितीच्या आधारावर भरारी पथकासह आम्ही पोहचलो. त्यात मोरे यांच्या कार्यकर्त्यांशी बोलत असताना माझ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला आणि त्यामुळे हाणामारी झाली. यात मोरे यांच्या मुलाचा समावेश आहे. असे कदम यांनी सांगितले. याबाबत शंकर मोरे यांच्याशी संपर्क होऊ न शकल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. हाणामारी झाल्याचे खरे असून काही जणांना ताब्यात घेतले असून चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल अशी माहिती पोलिसांनी दिली.